पनवेल महानगरपालिका

स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

# मा. मुख्यमंत्री महोदयांचा 100 दिवस-7 कलमी कृती कार्यक्रम तपशील




मंगेश चितळे (म. श. प्र. से.)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

# 1.संकेतस्थळ


## नवीन Dynamic संकेतस्थळ

संकेतस्थळ 12 भाषांमध्ये उपलब्ध

- दृष्टिहीन नागरिकांसाठी स्क्रीन रीडरचा पर्याय उपलब्ध.

- RTI टॅब. उपलब्ध सर्व विभागांचे अद्यावत स्वयंप्रकटीकरण.

- RTS टॅब अंतर्गत Citizen Charter प्रसिद्ध.




24x7 Chat Bot सेवा उपलब्ध आहे.

- संकेतस्थळ दैनंदिन अद्ययावत केले जाते (सभेचे ठराव, परिपत्रके, बातम्या, कार्यक्रम, इतर माहिती यांसह).
- संकेतस्थळाचे दरवर्षी सुरक्षा परीक्षण, वेब application सुरक्षा प्रमाणपत्र (प्रमाणपत्र क्रमांक: AKSIT/2024-25/0795) दिनांक 25 मार्च 2025 रोजी प्राप्त.

अधिक माहितीसाठी QR code

## 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

### अ. राज्याच्या विकासाशी संबंधीत केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव व विधेयकांचा पाठपुरावा करून पूर्तता करणे

**City Solid Waste Action Plan (CSWAP):**

- दुरुस्ती सहित प्रस्ताव दिनांक 17 डिसेंबर 2024 रोजी सादर.
- राज्य शासनाने SLTC मान्यतेसह 8 जानेवारी 2025 रोजी केंद्र शासनास सादर केला.
- केंद्र शासनाने दिनांक 15 मार्च 2025 रोजी मंजुरी दिली.

**NUHM :**

- पनवेल महानगरपालिकेने वाढत्या लोकसंख्येनुसार अतिरिक्त 5 नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांची मागणी राज्य शासनाकडे केली असून, त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

### आ. राज्यासाठी केंद्रीय योजनांचा दिलेला लक्षांक पूर्ण करणे

| आरोग्य केंद्राचा प्रकार | उद्दिष्ट | पूर्तता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापना | 15 | 15 | 100% |
| नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर | 9 | 9 | 100% |
| हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | 2 | 2 | 100% |



- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत 100% उद्धिष्ट पूर्ण करणारी एकमेव महानगरपालिका.
- जागतिक आरोग्य दिन निमित्ताने दिनांक 07 एप्रिल 2025 रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीमध्ये आयुष्यमान डिजिटल मिशनच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत पनवेल महानगरपालिकेस पुरस्कार प्राप्त.

अधिक माहितीसाठी
QR code

# 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

## आ. राज्यासाठी केंद्रीय योजनांचा दिलेला लक्षांक पूर्ण करणे

| NUHM कार्यक्रम | उद्दिष्ट | पूर्तता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| प्रधानमंत्री मातृवंदना योजना | 12251 | 22025 | 180% |
| मिशन इंद्रधनुष्य | 631 | 631 | 100% |
| ॲनिमिया मुक्त भारत | 152085 | 152085 | 100% |
| राष्ट्रीय पल्स पोलिओ कार्यक्रम | 67896 | 73193 | 108% |
| राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम | 30085 | 30085 | 100% |
| राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम | 50 | 60 | 120% |
| नियमित लसीकरण | 15200 | 15212 | 100% |

| NULM कार्यक्रम | उद्दिष्ट | पूर्तता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| स्वयंसहाय्यता बचतगट | 90 | 90 | 100% |
| वस्तीस्तर संघ | 4 | 4 | 100% |
| वैयक्तिक बचतगट लिंकेज | 46 | 54 | 100% |
| प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी | 10198<br>कर्ज वितरीत | 9363<br>कर्ज वितरीत | 91.82% |

**प्रशांत ठाकूर**
विधानसभा सदस्य

दुरध्वनी : ०२२ २७४६८१३३
फॅक्स नं. : ०२२ २७४५८१३४
मोबा. : ९९२००१७७७७

कार्यालय : ॲस्पायर प्राईड, पहिला मजला, रुपाली सिनेमा समोर, पनवेल - ४१० २०६. (रायगड).

जावक क्रं. : २४५६९/२०२५

दि. २२/०२/२०२५

प्रति,
मा. आयुक्त तथा प्रशासक,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभिनयातील उल्लेखनीय कामगिरीबाबत...

महोदय,

केंद्र शासनाच्या धोरणानुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत १५ प्राथमिक आरोग्य केंद्र नऊ राष्ट्रीय आयुष्यमान आरोग्य मंदिर व दोन हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखांना अशा एकूण २६ आरोग्य केंद्रांमार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दहा लाखांहून अधिक नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मोफत औषधोपचार व मोफत रक्त चाचण्यांची सुविधा आपल्या महापालिकेमार्फत पुरवण्यात येत असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. पनवेल महानगरपालिका नेहमीप्रमाणे यापुढेही नागरिकांच्या सेवेत सदैव तत्पर असेल अशी आशा आहे.

शुभेच्छांसह..!!
कळावे,

आपला,

(प्रशांत ठाकूर)

**स्थानिक आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर यांच्याकडून आरोग्य सेवेचे प्रमाणीकरण**

अधिक माहितीसाठी
QR code

## 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

## इ. केंद्रीय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्राप्त करुन घेणे, तसेच राज्याचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरीत करुन घेणे

**केंद्र शासनाच्या सर्व योजनांसाठी महानगरपालिकेचा हिस्सा अर्थसंकल्पित करून प्रत्यक्षात उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

### खालील प्रमाणे निधी प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

अमृत
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation

- अमृत अभियान 2 अंतर्गत प्राप्त निधी

| अ.क्र. | अभियान | प्रकल्प मंजुर किंमत रु. (कोटीत) | केंद्र शासन हिस्सा रु. (कोटीत) | राज्य शासन हिस्सा रु. (कोटीत) | नागरी स्थानिक स्वराज्य हिस्सा रु.(कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमृत अभियान 2 | 438.64 | 143.12 | 157.44 | 138.04 |

- 15 व्या वित्त आयोग योजना

| अ.क्र. | योजना | वर्ष | प्राप्त निधी |
|---|---|---|---|
| 1 | 15 व्या वित्त आयोग | सन 2020/21 पासून | 840,058,724 |

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## स्वच्छ भारत अभियान

IEC घटकांतर्गत जनजागृतीसाठी निधी प्राप्त

- केंद्र शासनाचा हिस्सा: ₹62.08 लाख
- राज्य शासनाचा हिस्सा: ₹41.38 लाख
- दोन्ही निधी अर्थसंकल्पीत करून पनवेल महानगरपालिकेस वितरीत.

Capacity building घटकांतर्गत कर्मचारी कार्यक्षमता वाढवण्यासाठी निधी प्राप्त

- केंद्र शासनाचा हिस्सा: ₹1 लाख
- राज्य शासनाचा हिस्सा: ₹0.66 लाख
- निधी अर्थसंकल्पीत करून PMC ला वितरीत.


अधिक माहितीसाठी QR code


## 2. केंद्र शासनाशी सुसंवाद


## ई. केंद्र शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळीच कार्यवाही करून अनुपालन सादर करणे.

केंद्र शासनाने AMRUT योजनेच्या अंतर्गत योजनांचे ऑडिट करण्यासाठी CPHEEO या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती केली आहे, तसेच त्यांनी घेतलेल्या आक्षेपांचे अनुपालन करण्यात आलेले आहे.


## एकूण 04 आक्षेप घेण्यात आले होते त्यानुसार 100% अनुपालन









## केंद्र शासनाच्या पत्रानुसार "स्वच्छता ही सेवा" अभियानाचे अनुपालन करण्यात आले आहे.




## केंद्र शासनाच्या पत्रानुसार "शौचालय अभियानाचे" अनुपालन करण्यात आले आहे.




अधिक माहितीसाठी

QR code

## 3. स्वच्छता

### अ. अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण

अभिलेख निंदणीकरणाचे काम दिनांक 13/02/2025 रोजी सुरू करण्यात आलेले आहे. त्याची सद्यस्थितीची माहिती खालील प्रमाणे.

| विभाग | कायमस्वरूपी जतन नसत्या (अ) | 30 वर्षांकरिता जतन नसत्या (ब) | 05 वर्षांकरिता नसत्या जतन (क) | 10 वर्षांकरिता नसत्या जतन (ड) | एकूण नसत्या |
|---|---|---|---|---|---|
| एकूण 25 विभाग | 40,833 | 9851 | 10,395 | 7314 | 68,393 |

### आ. मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे

| विभाग | वर्ग ड अभिलेखांची संख्या | मुदबाह्य नष्ट केलेल्या अभिलेकांची परिमाण |
|---|---|---|
| एकूण 25 विभाग | 7314 | 1268 Kg |

### इ. जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण

जड वस्तू संग्रह नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात आलेल्या आहेत

| वस्तू नोंदवही | नग |
|---|---|
| फुल साईज लोखंडी कपाट | 70 |
| खुर्ची रिव्हालिंग चेअर | 373 |
| ऑफिस टेबल | 207 |
| फर्निचर साहित्याचे इतर बाबी | 44 |

### ई. जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट

| जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट |
|---|
| पनवेल महानगरपालिका कार्यालयातील सर्व विभागाकडील जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची यादी करून त्याची विल्हेवाट लावणेकरिता ई निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. Tender Id : E-Auction Notice No.: PMC/STORE/Scrap/e-auction/2025 |

### उ. जुन्या वाहनांचे निर्लेखन

- 15 वर्षापेक्षा जुन्या एकूण 11 वाहनांची MSTC विभागामार्फत लिलाव प्रक्रिया पूर्ण.
- यातून रु. 9,75,000/- इतका निधी प्राप्त.




अधिक माहितीसाठी QR code

# 4. तक्रार निवारण

## अ. आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण

| माध्यम | एकूण प्राप्त तक्रारी | एकूण निवारण केलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| आपले सरकार | 730 | 730 | 0 | 100% |

## आ. PG पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण

| माध्यम | एकूण प्राप्त तक्रारी | एकूण निवारण केलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| PG पोर्टल | 85 | 85 | 0 | 100% |

## इ. अभ्यागत भेटीचे नियोजन व प्रसिध्दी फलक

एकूण 5 मुख्य कार्यालयांमध्ये अभ्यागत भेटीचे नियोजन दर्शविणारे प्रसिद्धी फलक लावण्यात आले आहेत.







## ई. लोकशाही दिनामधील तक्रारींचे निराकरण

| महिना | एकूण प्राप्त तक्रारी | निरसण केलेल्या तक्रारी | टक्के |
|---|---|---|---|
| जानेवारी 2025 | निरंक | निरंक | निरंक |
| फेब्रुवारी 2025 | निरंक | निरंक | निरंक |
| मार्च 2025 | 7 | 7 | 100% |
| एप्रिल 2025 | 3 | 3 | 100% |

# 5. कार्यालयीन सोई सुविधा

## अ. कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था




**45** कार्यालयात वॉटर कुलर फिल्टर बसविण्यात आलेले आहेत

### स्वच्छता फलक

सर्व प्रसाधनगृहांमध्ये स्वच्छता फलक लावलेले असून, त्यावर साफसफाईनंतर दिवसातून दोन वेळा स्वच्छतेची माहिती भरली जाते.

## आ. कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा

## इ. महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा

| एकूण कार्यालय | पुरुष प्रसाधनगृह | स्त्री प्रसाधनगृह | एकूण |
|---|---|---|---|
| 45 | 154 | 154 | 308 |

## ई. अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था

## उ. कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण






| एकूण कार्यालय | प्रतिक्षालय | नामफलक, दिशादर्शक |
|---|---|---|
| 45 | 45 | 210 |

### कार्यालयाचे सौंदर्यीकरण

- कार्यालयांना रंगकाम करून सौंदर्य वाढवले
- सर्व कार्यालयांची व्हॅक्युम क्लीनरच्या सहाय्याने स्वच्छता.
- नियमित स्वच्छतेसाठी वेळापत्रक.
- कार्यालयांमध्ये सजावटीसाठी हिरवळीची झाडे.

अधिक माहितीसाठी QR code

# 6. कामकाजातील सुधारणा

## अ. कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे ई-ऑफिस प्रणाली वापरण्याचे प्रमाण

**100%**

| एकूण कार्यालय | विभाग संख्या | अधिकारी | कर्मचारी | एकूण | ई-ऑफिस वापर टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 45 | 35 | 28 | 282 | 310 | 100% |

## आ. ई-ऑफिस प्रणालीतील 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे


**पूर्वी**

1. लिपिक
2. विभाग प्रमुख अधीक्षक
3. सहाय्यक आयुक्त /शहर अभियंता
4. उपायुक्त
5. अतिरिक्त आयुक्त
6. आयुक्त

**आता**

1. विभाग प्रमुख अधीक्षक
2. सहाय्यक आयुक्त /शहर अभियंता
3. उपायुक्त
4. आयुक्त

## इ . ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी (%)




अधिक माहितीसाठी QR code

# 6. कामकाजातील सुधारणा

## ई) वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण / खुलासा वेळीच प्रसिध्द करणे

- 23 ऑक्टोबर 2024 – दैनिक सकाळ मध्ये खारघरमधील उद्यानांतील खेळणी तुटल्याची बातमी प्रसिद्ध.
- 27 ऑक्टोबर 2024 – खेळणी दुरुस्त केल्याचा खुलासा वृत्तपत्रात प्रसिद्ध.



खारघरमधील
उद्यानाची दुरवस्था
मुलांची गैरसोय ; प्रशासनाचे दुर्लक्ष

खारघर, ता. २२ (बातमीदार) : पनवेल महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या खारघर सेक्टर २० येथील उत्सव चौकशेजारी असलेल्या उद्यानाची अत्यंत दुरवस्था झाली आहे. येथील खेळणी तुटली असल्याने पालकवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खारघर सेक्टर २० शिल्प चौक लगत सिडकोने उद्यान विकसित केले आहे. हे शहरातील मध्यवर्ती उद्यान असल्यामुळे परिसरातील अनेक लहान बालके येथे खेळण्यासाठी येत असतात. येथील सेक्टर १३, २० आणि २१ मधील लहान मुलांची या उद्यानात गर्दी असते. मात्र उद्यानातील झोपाळा तसेच इतर खेळणी तुटलेली आहेत. तुटलेल्या खेळणीमुळे गंभीर दुखापत होण्याची भीती पालकवर्गातून व्यक्त केली जात आहे. येथील उद्यानांची निर्मिती सिडकोने केली आहे. त्यामुळे पूर्वी सिडकोकडून येथील सर्व उद्यानांची डागडुजी केली जात असे. मात्र पनवेल महापालिका आल्यानंतर उद्यानांकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. पालिकेने खारघरमधील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. मात्र उद्यानांकडे दुर्लक्ष होत असल्याने पालकवर्गासह ज्येष्ठ नागरिकांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

येथील उद्यानातील खेळणी तुटलेली आहेत. मात्र पालिका प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. खेळणी मोडकळीस आल्यामुळे दिवाळीच्या सुटीत मुलांनी खेळायचे कुठे, असा प्रश्न पडला आहे.
- केशरीनाथ पाटील,
जिल्हा चिटणीस, मनसे

सेक्टर २० उद्यानाची पाहणी करून मोडकळीस आलेली खेळणी दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला जाईल.
- वैभव विधाते,
उद्यान अधिकारी, पनवेल महापालिका

खारघर : उद्यानातील खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत.

सकाळ कनेक्ट

**स्पष्टीकरण**



उद्यानातील तुटलेल्या खेळण्यांची दुरुस्ती
'सकाळ'च्या बातमीचा परिणाम; नागरिकांना दिलासा

खारघर, ता. २७ (बातमीदार) : पनवेल महापालिकाअंतर्गत असलेल्या खारघर सेक्टर २० येथील उत्सव चौकशेजारी असलेल्या उद्यानाची अत्यंत दुरवस्था झाली होती. येथील खेळणी तुटली असल्याने पालकवर्गातून नाराजी व्यक्त केली जात होती. याप्रकरणी 'सकाळ'मध्ये बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. या बातमीची दखल घेऊन पनवेल महापालिकेने अखेर उद्यानातील खेळणी बसविण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे दिवाळीच्या सुटीत मुलांना उद्यानात मनसोक्त खेळता येणार असल्यामुळे पालक समाधान व्यक्त करीत आहे.

खारघर सेक्टर २० शिल्प चौकलगत सिडकोने उद्यान विकसित केले आहे. हे शहरातील मध्यवर्ती उद्यान असल्यामुळे परिसरातील अनेक लहान बालके येथे खेळण्यासाठी येत असतात. येथील सेक्टर १३, २० आणि २१ मधील लहान मुलांची या उद्यानात गर्दी असते; मात्र उद्यानातील झोपाळा तसेच इतर खेळणी तुटलेली होती. तुटलेल्या खेळणीमुळे गंभीर दुखापत होण्याची भीती पालकवर्गातून व्यक्त केली जात होती. येथील उद्यानांची निर्मिती सिडकोने केली आहे. त्यामुळे पूर्वी सिडकोकडून येथील सर्व उद्यानांची डागडुजी केली जात असे; मात्र पनवेल महापालिका आल्यानंतर उद्यानांकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत होते.

खारघर : उद्यानात नवीन खेळणी बसविण्यात आली आहेत.

खारघरमधील सर्व उद्यानातील मोडकळीस आलेल्या खेळण्यांची दुरुस्ती केली जात आहे. तर, काही उद्यानातील मोडकळीस आलेली खेळणी नव्याने बसवण्यात येत आहे. दिवाळी सुटीत मुलांना उद्यानात खेळता येतील, यासाठी प्रयत्न सुरू असून नागरिकांचे हित लक्षात घेऊन उद्यानात सुरक्षा रक्षकाची नेमणूक केली आहे.
- वैभव विधाते, उद्यान अधिकारी, पनवेल महापालिका

दरम्यान, 'सकाळ'मध्ये ता. २३ रोजी 'खारघरमधील उद्यानाची दुरवस्था' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. या बातमीची दखल घेऊन पालिकेच्या उद्यान विभागाने तुटलेल्या खेळणीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. त्यामुळे ऐन दिवाळी सुटीत खेळणी बसविण्याचे काम हाती घेतल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

- 9 एप्रिल 2025 – दै. प्रात:काल मध्ये छ. संभाजी महाराज मैदानात पार्किंग होत असल्याची चुकीची बातमी प्रकाशित.
- 10 एप्रिल 2025 – सदर माहिती चुकीची असल्याचा खुलासा दै. प्रात:काल मध्ये प्रसिद्ध.



प्रातःकाल
Marathi Edition | 2025-04-09 | Page- 3

छ. संभाजी महाराज मैदानावर वाहनांचे पार्किंग, मुलांनी खेळायचे कुठे?

पनवेल, दि. ०८ (वार्ताहर) : पनवेल महानगरपालिकेच्या मागील बाजूला असलेले छत्रपती संभाजी महाराज मैदान हे पालिकेत ये जा करणाऱ्यांचे पार्किंग स्थळ होत आहे. त्यामुळे या भागातील मुलांनी तसेच शेजारील शाळांमधील विद्यार्थ्यांनी कोठे खेळायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महापालिकेने मुलांना खेळता यावे यासाठी भव्य असे संभाजी महाराज मैदान तयार केले असले तरी दिवसभर या मैदानाचा उपयोग महापालिकेत येणाऱ्या जाणाऱ्या लोकांसाठीच्या गाड्या पार्किंगसाठी केला जात आहे. त्यामुळे शेजारील याकुब बेग शाळा व उर्दु शाळा तसेच या परिसरातील मुलांनी कोठे खेळायचे, असा प्रश्न निर्माण होत आहे.

महापालिकेत येणाऱ्या नागरिकांना तसेच कर्मचाऱ्यांच्या गाड्या पार्किंगसाठी खास अशा जागेची सोय नसल्याने महापालिकेत येणारे नागरिक या मैदानात बिनधास्त गाड्या पार्क करतात. महापालिका ही नागरिकांची समस्या सोडविणारी प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था आहे. पण महापालिकेच्या दारातच निर्माण होणाऱ्या या समस्येवरती केव्हा तोडगा निघणार, याची आता वाट पहावी लागणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुदतवाढ सूचना
ई निविदा सूचना क्र. ८४/२०२४-२०२५ (मुंबई) करीता

Powered by Bharati Web

**स्पष्टीकरण**



प्रातःकाल
Marathi Edition | 2025-04-10 | Page- 3

छ. संभाजी महाराज मैदान हे फक्त खेळण्यासाठीच
पनवेल महानगरपालिकेचा खूलासा

पनवेल, दि. ०८ (वार्ताहर): पनवेल महानगरपालिकेच्या मागील बाजूला असलेले छ. संभाजी महाराज मैदान हे त्या भागातील याकुब बेग शाळा व उर्दु शाळा तसेच या परिसरात राहणाऱ्या मुलांना खेळण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. यासाठी पालिकेने या मैदानास लोखंडी कुंपण घातले आहे. छ. संभाजी महाराज मैदानावर वाहनांचे पार्किंग, मुलांनी खेळायचे कुठे? अशा मथळ्याखाली दै. प्रातःकालमध्ये बुधवार दि. ९ रोजीच्या अंकात बातमी छापून आली आहे. यासंदर्भात महापालिकेने खुलासा केला आहे. यात महापालिकेने म्हटलेय की, महापालिकेने मुलांना खेळता यावे यासाठी भव्य असे छ. संभाजी महाराज मैदान तयार केले आहे. या मैदानाची नुकतीच महापालिकेने डागडूजी करून, या मैदानाभोवती लोखंडी कुंपण घालून, प्रेक्षकांना बसण्यासाठी प्रेक्षक गॅलरीही बांधली आहे. फक्त मुलांना खेळण्यासाठी हे मैदान राखीव ठेवण्यात आले आहे. वाहनांचे पार्किंग हे मैदानाशेजारील रिकाम्या जागेत केले जात असून मैदानावर कोणत्याही स्वरूपाचे पार्किंग केले जात नाही. महापालिके शेजारील याकुब बेग शाळा व उर्दु शाळेच्या विद्यार्थी शाळेच्या मधल्या सुट्टीच्या कालावधीमध्ये या ठिकाणीच कायम खेळत असतात.

अधिक माहितीसाठी QR code

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

## अ. नव्याने सेवेत रुजू झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे

- सरळसेवा पदभरती 2023 अंतर्गत नवनियुक्त 250 अधिकारी / कर्मचारी यांना ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक केंद्र यांचेमार्फत प्रशिक्षण देणेकामी दि.10/02/2025 अन्वये कार्यादेश.
- सदर प्रशिक्षण आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे.
- प्रशिक्षण घेतलेल्या सर्व नव नियुक्त अधिकारी/ कर्मचारी यांना प्रमाणपत्रांचे वाटप.

## आ. सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे (31 मार्च 2024 पर्यंतचे)

- आस्थापनेवरील गट “अ” ते गट “ड” मधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे दि. 01/04/2023 ते दि. 31/03/2024 या कालावधीचे कार्यमुल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत परिपत्रक दि. 28/03/2024 अन्वये परिपत्रक निर्गमित.
- कार्यरत 616 अधिकारी / कर्मचारी यांचे मुल्यमापन अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन करुन प्राप्त.








अधिक माहितीसाठी
QR code

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

## इ) सेवाज्येष्ठता याद्या प्रसिद्ध करणे व पदोन्नत्या करणे




1. दि. 01/01/2024 रोजी ची सेवा ज्येष्ठता यादी अंतिम करुन महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर व नोटिस बोर्डवर प्रसिध्द.
2. 01/01/2025 रोजी या वर्षाची यादी प्रसिद्ध

- दि.01/01/2024 रोजीच्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादी विचारात घेवून पात्र 11 अधिकारी/ कर्मचाऱ्यांना दि.11/10/2024 रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार पदोन्नती.
- दि.13/04/2025 रोजी उर्वरित 02 कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली.
- पदोन्नती बाबत १००% पूर्तता.

अधिक माहितीसाठी
QR code


## ई. न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे

| अ. क्र. | मा. न्यायालय | एकूण न्यायालीन प्रकरणे | निकाली न्यायालीन प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| 1 | मा. सर्वोच्च न्यायालय | 4 | 4 | 0 |
| 2 | मा. उच्च न्यायालय | 41 | 10 | 31 |
| 3 | मा. मानवाधिकार आयोग | 3 | 2 | 1 |
| | एकूण | 48 | 16 | 32 |


### विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा

- एका कर्मचारी विरुद्ध सुरु असलेली विभागीय चौकशी विहित प्रक्रियेद्वारे पूर्ण करण्यात येऊन प्रकरणाचा निपटारा केला.
- विभागीय चौकशी 100% निपटारा करण्यात आले

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)



## उ. कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे




1. विधी विभागामार्फत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील निकालांचे संदर्भ घेऊन सारांश काढण्यासाठी वेळोवेळी ChatGPT व कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करण्यात येतो.
2. सॅटेलाईट आधारित अतिक्रमण नियंत्रण प्रणाली - इस्रोमध्ये निर्माण करण्यात येणाऱ्या उच्च रिझोल्यूशन उपग्रह प्रतिमांचा वापर या पद्धतीत केला जातो. अशा प्रकारे अत्याधुनिक पद्धतीने real time data घेऊन, AI च्या सहाय्याने त्याचे Analysis करून अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण करणारी पनवेल महानगरपालिका ही एकमेव स्थानिक संस्था आहे.
3. पनवेल महापालिकेच्यावतीने भटक्या श्वानांचे व भटक्या मांजरांचे सर्वेक्षण. देशात प्रथमच AI प्रणालीचा वापर करून श्वानांची डिजिटल माहिती संकलन.
   - फेस रेकग्निशन/इमेज मॅचिंग - एकाच कुत्र्याची पुन्हा नोंद होऊ नये यासाठी फोटो ओळखण्याचे तंत्र वापरले जाते.
   - युनिक ID जनरेशन - प्रत्येक श्वानासाठी वेगळा डिजिटल कोड तयार केला जातो, ज्यामुळे पुनरावृत्ती रोखली जाते.
   - डेटा डुप्लिकेशन फिल्टरिंग - नव्या नोंदी आधीच्या डेटाशी तुलना करून तपासल्या जातात.
   - GPS आधारित नोंद - नोंद घेताना ठिकाणाची अचूक माहिती घेतली जाते, जेणेकरून एकाच परिसरात एकाच कुत्र्याची पुन्हा नोंद होणार नाही.
   - भ्रष्टाचारावर नियंत्रण - AI मुळे एजन्सीला बनावट कुत्र्यांचे फोटो वापरता येत नाहीत. प्रत्येक कुत्र्याची ओळख युनिक असल्याने PMC कडून अनधिकृत पेमेंट घेता येत नाही.




अधिक माहितीसाठी QR code

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

## अ. गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे

- रस्ते, पाणी, मलनिस्सारण व कचरा व्यवस्थापनाद्वारे मूलभूत सुविधा उपलब्ध. CCTV बसवून सुरक्षित उद्योगपर्यावरण निर्मिती.
- रोजगार मेळावे, 'पनवेल कनेक्ट' ॲप या प्लॅटफॉर्म द्वारे कंपन्यांना रोजगार उपलब्ध होण्याची संधी. 'चाणक्य केंद्रा'तून प्रशिक्षित स्थानिक कामगार तयार.

## आ. व्यापारी / कामगार यांच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडवणे.

- दिनांक 28/01/2025 रोजी तळोजा, जवाहर व पनवेल औद्योगिक क्षेत्रातील 62 उद्योजक, बांधकाम व्यावसायिकांसोबत बैठक घेऊन अडचणींचे निराकरण.
- भाजी मार्केटमध्ये चोरीच्या तक्रारीनंतर CCTV कॅमेरे बसवून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती.
- स्टील मार्केट असोसिएशनच्या मागणीनुसार शौचालय व घनकचरा व्यवस्थापन सुविधा उपलब्ध.




## इ. गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे

- औद्योगिक वसाहत मधील मालमता कर विषयी प्राप्त तक्रारी बाबत सत्यता पडताळून विहित प्रक्रियेने मालमत्ता कर आकारणी दुरुस्त करण्यात आली.

## ई. गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करणे

- एकल खिडकी सुविधा
- विविध परवानग्या ऑनलाईन पध्दतीने प्राप्त करून घेण्याकरीता महापालिकेमार्फत www.tradepanvelmc.org हे संकेतस्थळ विकसित.




अधिक माहितीसाठी QR code

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम - सुकर जीवनमान
## अ. नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण

### 1. स्वयं कर निर्धारण

- या पूर्वी मालमत्ता कर निर्धारण करण्यासाठी 15 दिवसांचा कालावधी लागायचा तथापि या मध्ये सुधारणा करून नागरिकाकडूनच महानगरपालिकाच्या अँप द्वारे स्वयं मूल्य कर निर्धारण केले जाते, या मुळे सदर सेवा 1 दिवसात उपलब्ध झालेली आहे.

### 2. पनवेल महा ई सेवा हमी केंद्र

- पनवेल महानगरपालिकेने कामोठे, नवीन पनवेल, कळंबोली आणि खारघर येथे 4 महा ई सेवा केंद्रांची स्थापना केली आहे.
- या केंद्रांवर 7/12 उतारा, रहिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र यांसारख्या विविध सेवा एका ठिकाणी उपलब्ध आहेत.
- नागरिकांना रांगा लावण्याची किंवा कार्यालयात वारंवार जाण्याची गरज नसून, यामुळे वेळेची बचत होते.

### 3. RTS अंतर्गत विहित केलेल्या सेवांपैकी 8 सेवा पुरविण्याचा कालावधी कमी करण्यात आला आहे.

| अ. क्र. | अधिसूचित लोकसेवेचे तपशील | विहित केलेली कालमर्यादा | सुधारित कालमर्यादा |
|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र | 15 | 1 |
| 2 | परवाना दुय्यमप्रत | **15** | 3 |
| 3 | पाणी पुरवठा विभाग - नवीन नळ जोडणी / अनधिकृत इमारतींना नळजोडणी देणेबावत | 15 | 10 |
| 4 | नवीन परवाना मिळणे | **15** | 10 |
| **5** | परवान्याचे नुतणीकरण | 15 | **10** |
| 6 | सिनेमा चित्रीकरण परवाना | 15 | **10** |
| 7 | जल निसारण जोडणी देणे | 15 | **10** |
| 8 | महाराष्ट्र (नागरीक्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ अन्वये धोकादायक झाड तोडणे अथवा छाटणी करीता परवानगी. | **60** | 45 |

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम - सुकर जीवनमान

## अ. नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण

**4. पनवेल महानगरपालिकेमार्फत प्राथमिक उपचार देणेकामी दोन पशुवैद्यकीय फिरते दवाखाने उपलब्ध केले आहेत.**

### पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय फिरता दवाखान्या मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा :

- पाळीव प्राण्यांची आरोग्य तपासणी, पाळीव प्राण्यांकरिता प्राथमिक औषधोपचार, रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण, जंत - निर्मूलन, तसेच प्राणांच्या उत्तम आरोग्या करिता वैद्यकीय सल्ले दिले जातील

### उपयोग

- दूरस्थ भागात पशू उपचार सेवा (प्राथमिक उपचार, लसीकरण, शस्त्रक्रिया इ.)
- प्रभाग स्तरावर दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध.
- प्राणीजन्य रोगांवर नियंत्रण – आरोग्य सुधारणा
- प्राण्यांचे लसीकरण व उपचार सुविधा कार्यान्वित
- मा. मुख्यमंत्री यांच्या 100 Days Make Over Drive सूचनेनुसार रुग्णालय उभारणी









अधिक माहितीसाठी QR code

## 10. नाविन्यपूर्ण उपक्रम


### अ. विभागामध्ये कार्यालयीन व्यवस्थापनात नाविन्यपूर्ण उपक्रम

## 1. PANVEL CONNECT एक शहर, एक ॲप

### ॲपची वैशिष्ट्ये

- 24x7 नागरिकांसाठी कॉल सेंटर तक्रार निवारण सेवा.
- वापरातील सुलभता (User Friendly)
- सर्व प्रकारचे तक्रारी, त्यांचे झालेले निराकरण, प्रलंबित तक्रारी या बाबतचे डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध.
- तक्रारीचे निवारण झाल्यानंतर नागरिकास कळविण्याची व्यवस्था.
- सर्व नागरी सेवा करीता एक ॲप.
- चॅटबॉट सुविधा.
- आपत्कालीन सेवा
- सर्व तक्रारींसाठी एक खिडकी समाधान

अधिक माहितीसाठी QR code



# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम

## अ. विभागामध्ये कार्यालयीन व्यवस्थापनात नाविन्यपूर्ण उपक्रम

### 2. अर्थ संकल्पीय व्यवस्थापन प्राणली (Budget Control Register)

- ☑ संगणकीकरण केलेले अर्थव्यवस्थापन
- ☑ तरतुदीच्या अधीन मान्यता
- ☑ वित्तीय शिस्तीचे पालन
- ☑ डॅशबोर्डद्वारे वार्षिक आढावा
- ☑ कपात रक्कमांचे अचूक अहवाल
- ☑ पूर्वदायित्व सहज उपलब्ध
- ☑ विभागनिहाय खर्च आढावा वित्तीय स्थितीचे संघटित रिपोर्ट्स

4/10/25, 2:07 PM Document

**Panvel Municipal Corporation**
Budget Control Register
BCR No. BCR252604300991
Financial Year-25-26 Date 09-04-2025

| | |
|---|---|
| Department : | **Solid Waste Management Department** |
| Budget Type : | **A - Revenue Expenditure** |
| Budget Head : | **Other matters relating to solid waste** |
| Account Code : | **3462550003** |
| Execution Type : | **Mannual Tender** |
| BCR Mode : | **Full** |
| Work Details : | पनवेल महानगरपालिका हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत स्वच्छ भारत अभियानांच्या अनुषंगाने कचरा वर्गीकरणाची जनजगृती करणेकरीता घंटागाडीचे रंगकाम करणे आणि डस्टबिन पुरविणे. |
| Total Work Amount : | **202000** |

| | |
|---|---|
| **Budget Provision Amount**<br>Reappropriation<br>Spill Over | **9200000**<br>**0**<br>**3167406.26** |
| **Current Year Provisional Amount** | **6032593.74** |
| **Released Amount** | **6032593.74** |
| **Effective Balance** | **6032593.74** |
| BCR Booked Till Date<br>Amount Booked for Current Work<br>**Total Booked (BCR)** | **0**<br>**202000**<br>**202000** |
| **Balance** | **5830593.74** |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त माहितीचा तपशील अचूक असलेबाबत खात्री केलेली आहे.

**Recorded By**

**Signature :** ______________

विभाग प्रमुख
**(Head of Department)**

अधिक माहितीसाठी
**QR code**

जनहितः परम् ध्येयम्

पनवेल महानगरपालिका

स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका
# धन्यवाद

